# आजच्या जीवनात स्वामी विवेकानंदाच्या तत्वज्ञानाची प्रांसगिकता

**डॉ.बाबासाहेब पाबळे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
मत्स्योदरी कला,वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, अंकुशनगर

**गोषवारा**

स्वामी विवेकानंदाच्या तत्वज्ञानाच्या विचाराचे सार हे समग्र प्रागतिक चिंतनातुन स्पष्ट होते. ते काळाच्या पुढे असलेले विचारवंत होते. त्यांनी विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी, व्यापारी, गरीब, श्रीमंत, पिडीत, महिला, वैज्ञानिक,हिंदु, अहिंदु, आस्तिक,नास्तिक, प्रस्थापित, विद्रोही, या सर्वच स्तरावरील माणसाला आपलेसे करून त्यांची उन्नती साधणारे आहेत. प्रत्येक भारतीय माणसाचे विचार विश्व समृद्ध करण्यावर त्यांनी भर दिला त्यांच्या कार्य तत्वज्ञानाच्या चिंतनातुन भारतीय समाजमन घडले आहे. भरतीय माणसाला नित्य जीवनात सामाजिक, अध्यात्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षर्णिक तत्वाज्ञानाच्या परिवर्तनाचा संदेश त्यांनी संपुर्ण जगाला दिला. त्यांच्या सामाजिक विचाराचा प्रभाव काळाच्या कितिही पुढे गेला तरीही अजुन कायम आहे. 21 शतकात माणुस म्हणूण नवा समाज आणि नवी संस्कृती घडवितांना आजच्या जीवनात स्वामी विवेंकानंदाच्या विचारांची गरज आहे. तसे झाले तर भारतीय जीवनात प्रगती व सामार्थ्याची नवी पहाट होऊ शकेल.

**प्रस्तावना :–**

भारत ही अशा अनेक महापुरूषांची आणि सत्यशोधकांची जन्मभुमि आहे. ज्यांनी आपल्या प्रयत्नांने मातृभुमिच्या गौरवात भर घातली. भारताला आध्यात्मिक क्षेत्रात जगद्गुरू म्हणुण संबोधले जाते. ते याच महत्वाकांक्षी व्यक्तिच्या प्रतिभेमुळे. प्राचीन वैदिक ऋषिमुनी पासुन ते विवेकानंदा पर्यत याच परंपरेचे ते प्रतिनिधी होते. स्वामी विवेकानंद हे भारतीय समाज प्रबोधनाच्या चळवळीतील थोर विचारवंत होते. त्यांनी आपल्या प्रभावशाली विचारातुन नवभारताची जडणघडण केली. भारतातील समाजिक प्रबोधन चळवळीचे वैशिष्टे असे की, युरोपातील समाज प्रबोधन चळवळीने सामाजिक , अध्याात्मिक, शैक्षर्णिक जागृतीची लाट निर्माण झाली. राजाराम मोहनरॉय यांनी ब्राम्हो समाज स्थापन केला होता. त्यामुळे बंगालमध्ये इंग्रजी शिक्षणा बरोबर सामाजिक

सांस्कृतिक परिवर्तन झाले. ब्राम्हा समाजानंतर आर्य समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थाना समाज अशा अनेक चळवळी सुरू झाल्या स्वामी विवेकानंदानी आपले गुरू रामकृष्ण परमहंस यांच्या प्रेरणेणे सामाजिक ,धार्मिक, शैक्षर्णिक जागृतीची मुहुर्तमेढ रोवली त्यातुन त्यांनी रामकृष्ण परमहंस मिशनची स्थापना केली. या उद्‌दात्त मुल्यांवर व ध्येयवादावर भर देउन स्वमी विवेकानंदानी आपल्या विचाराच व कार्याचा प्रचार केला. भारतीय संस्कृती आणि तिचे आध्यात्मिक स्वरूप यावर भर देउन त्यांनी जगभर भारतीय संस्कृतीचा संदेश पसरविला. त्यातुन त्यांच्या आजच्या जीवनात कार्यरत असलेले तत्वज्ञानाचे महत्व हे सांस्कृतिक राष्टवादाच्या उभारणीस हातभार लावणारे ठरले.

संशोधनाचा उद्‌देश्य :–

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनुषंघाने आजच्या जीवनात स्वामी विवेंकानंदाच्या कार्य तत्वज्ञानाचे महत्व किंवा त्यांच्या तत्वज्ञानाच्या विचारांच्या प्रासंगिकतेच्या अभ्यास करणे हा संशोधनाचा प्रमुख उद्‌देश्य आहे.

संशोधन पद्‌धती :–

प्रस्तुत संशोधनास प्राथमिक व दुय्यम साधानांचा वापर केला व त्यासंबधी आवश्यक असणारी माहिती, संदर्भग्रंथ या साधानाव्दारे माहितीचे विश्लेषण केले आहे.

सामाजिक तत्वज्ञान :–

स्वामी विवेकानंदाचे सामाजिक तत्वज्ञान हे सामान्य माणसाच्या सुख दुखाःवार आधारलेले होते. राष्ट्राची प्रगती ही सर्वसामन्य जनतेच्या विकासावर अवलंबुन होती. भारतातील असंख्या गरीब लोक उपासमारीने मृत्युमुखी पडतात याची पुर्ण जाणीव विवेकानंदाना होती. गरीबांची पिळवणुक, मोठया प्रमाणात शोषण चाललेले आहे. याचाही त्यांना अनुभव होता. म्हणुणच धोक्याचा इशारा देतांना ते म्हणतात ' सर्वसामन्य जनतेची उपेक्षा हे मी घोर राष्ट्रीय पाप मानतो ' आपल्या अवनतीचे ते एक कारण आहे. भारतातील सर्वसामन्य जनता सर्व सुखी होईपर्यत आपण एकटे सुखी आहोत, असे म्हणण्याची आधिकार कोणासही नाही. भारतातील सर्वसामान्य जनतेला जोपर्यत चांगले शिक्षक दिले जात नाही, तोपर्यत सामाजिक सुधारणा रचनात्मक होणार नाहीत, तोपर्यत राष्ट्राचा विकास होणार नाही. विवेकानंदाच्या सामाजिक तत्वज्ञानाच्या चिंतनातुन सामान्य माणुस हा केंद्र बिंदु होता. रंजल्या गांजल्या, दुखी, कष्टी, सामान्य माणसाचे जीवन आमुलाग्रपणे बदलावे हा विवेकानंदाच प्रयत्न होता. खरे तर विवेकानंदानी भारतातील सामाजिक, आर्थीक शोषणाची आणि सांस्कृतीक उन्नतीची इतके प्रगल्भ

विश्लेषण केले आहे की, असे विश्लेषण अन्य कोणीही केले नसेल, विवेकानंदाचा हा विचार मानवतावादी दृष्टिकोनातुन महत्वाचा आहे. म्हणुण आपल्याला भारताचे पुनुरूत्थान घडवुन आणायचे असेल तर आपण सर्वसामन्यासाठी कधी तरी विधायक सामाजिक लोककल्याणांच कार्य केलं पाहिजे.

धर्म आणि विज्ञानविषयक विचार :–

विवेकांनद म्हणतात, सगळे धर्म मानवमात्राला एकाच अंतिम ध्येयाकडे घेउन जातात. धर्म हा केवळ शब्दात आणि मतमतांतरात साठवलेला आहे. नैतिकत, मानसिक पावित्र, निष्कपट हदय, आत्मसमपर्णाचा भाव इत्यादी साधने मानवाला आत्मसाक्षात्काराच्या ध्येयाकडे घेउन जातात. खरा ध्येयनिष्ट साधक धर्मावरून कधीही भांडण करीत नाही. यावर विवेकानंद म्हणतत, 'धर्मावरून होणारी भांडणे ही धर्माच्या बाहय अंगावरून होत असतात, जेव्हा पावित्र्य व आध्यात्मिक वृत्ती लोप पावतात, तेव्हाच भांडणे होतात. हि विवेकानंदाच्या विचाराची प्रांसगिकता मानवाला जीवनाचा मार्ग दाखविते. सर्वासाठी एकच धर्म असु शकणार नाही कारण प्रत्येक धर्म हा सुत्रात ओवलेला मण्याप्रामणे आहे.

अनुभव हेच ज्ञानाचे एकमेव साधन आहे. या जगात धर्म हेच एकमेव असे शास्त्र आहे की, त्यांचे निश्चित स्वरूप कळत नाही. कारण ते अनुभवाचे शास्त्र म्हणूण शिकविले जात नाही. परंतु अशीही काही माणसे आपल्याला निर्दशनास येतात की, जी नेहमी स्वतःच्या अनुभुतीच्या आधाराने धर्म शिकवत असतात. धर्माचे हेच खरे विज्ञान आहे. विवेकानंद म्हणताात, धर्म आणि विज्ञान एकामेंकापासुन दुर राहुन चालणार नाही. धर्म म्हणजे साचलेले डबके नव्हे, तर तो खळखळता प्रवाह हवा. धर्म व विज्ञान यामध्यील संघर्ष जर असाचे चालु राहिला तर धर्माची संपुर्ण इमारत कोसाळल्याशिवाय राहणार नाही. विवेकानंद म्हणताता, 'धर्म आणि आधुनिक भौतिक विज्ञान यांच्यात समन्वय घडवुन यावयास हवा. या समन्वयातुनच जगात शांतता नांदेल.

जगात कुठलाही एक धर्म श्रेष्ट नाही. हे ही त्यांनी जगाला सांगितले होते. आज धर्माच्या नावाखाली शुद्ध अधर्म सुरू आहे. स्वामीजीचे विचार समजुन घेतले की, आपले धर्मवेडेपणा लक्षात येईल. धर्माबद्दल ते म्हणतात, 'धर्म हा प्रत्येकाच्या जीवनात उतरावा असा प्रयत्न मला करावयाचा आहे. प्राचीन काळाप्रमाणे या देशात धर्म हा राज प्रसादापासुन तो अंत्यंत गरीब अशा श्रमिकांच्या झोपडया पर्यत सर्वत्र. प्रविष्ट झाला पहिजे.

शैक्षर्णिक तत्वज्ञान :–

जीवनविषयक विचाराप्रमाणेच स्वमी विवेकानंदाचे शिक्षणविषयक तत्वज्ञान प्रभावी आहे. भारताला उत्कर्षा कडे नेण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे शिक्षण आहे. विवेकानंद म्हणतात, 'शिक्षण सर्वसामन्या पर्यत पोहचले पाहिजे. राष्ट्रनिर्मीतिचा हाच एकमेव पाया आहे. शिक्षण म्हणजे निसर्गात अथवा कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अस्तिवात आहे परंतु आपल्याला त्याचे ज्ञान झाले नाही. अशा विषयाबाबत परिस्थिती अनुभवुन चिंतनाच्या सहायाने ज्ञान प्राप्तीची प्रकिया होय तेच माणसात अंतर्निर्हित असते.

स्वामी विवेकानंदाच्या दृष्टिने ज्ञानाचा उगम हा मानवी मनातुन होतो. ज्ञान हे मानवाच्या मनात उपजतच सुप्त अवस्थेत असते. मन हे विश्वाचे विशाल ग्रंथालय आहे. बाहय जगातील एखाद्या प्रसंगातुन सुचना मिळते ती सुचना मनाला कार्यप्रवण करते व त्यातुन ज्ञानाचा अविस्कार होतो. ज्ञानप्राप्ती म्हणजे आत्मानुभुती, आत्मसाक्षात्कार होय स्वामी विवेकानंदाच्या मते कोणीही कोणाला शिकवु शकत नाही, स्वंयशिक्षणाणे मुल शिकते. मुलांच्या गरजा प्रमाणे त्यांना शिक्षण द्यावे. विवेकानंदाच्या मते स्वतःचा स्वतःवर विश्वास असणे ही आत्मविश्वासाची पहिली पायरी आहे. स्वतःवरील विश्वासाचा विकास व्हावा म्हणुण आत्मज्ञान करवुन घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे.'

स्त्री शिक्षणविषयक विचार :–

समाजात आणि कुंटुबात स्त्रियांना सन्मानाने वागविले पाहिजे. समाजाची प्रगती ही समाजाता स्त्रियांना मिळणा–या प्रतिष्टेवर ओळखली जाते. 'यत्र नार्यस्त्रु पुज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' यावर त्यांचा विश्वास होता सांस्कृतिक वारसा कायम इेवुन स्यिांना आधुनिक बनविले पाहिजे. सुषिक्षत स्यिांनी आपले आयुष्य शिक्षण देण्यात व स्त्रियांचा उद्धार करण्यात घालवावे. स्त्रियांचा उदधार झााल की, देशाचा आपोआप विकास होईल यवर त्यांचा विश्वास होता. विवेकानंद बाल विवाहाच्या प्रथेविरूद्‌ध होते, स्त्रियांना इतिहास, पुराने, गृहव्यवस्था, विविधि कला आणि चारित्र्य संवर्धनाची माहिती शिकवली पाहिजे.

सारांश :–

स्वामी विवेकानंदांचे विचार भारताच्या आजच्या जीवनामध्ये राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक व शैक्षणिक प्रगतीसाठी नवी दिशा देणारी आहेत हे स्पष्ट होते. सामाजिक, आर्थिक न्यायावर आधारीत दारिद्रयमुक्त कर्तृत्वान एक संपन्न व शक्तिशाली भारत निर्माण करण्याचे व जगाला अध्यात्मिक सांस्कृतिक नेतृत्व देण्याचे स्वप्न स्वामी

विवेकानंदांनी पाहिले होते ते स्वप्न साकार करण्यासाठी त्यांच्या आजच्या जीवनात तत्वज्ञानाची अत्यंत आवश्यकता आहे.

निष्कर्ष :—

स्वामी विवेकानंदांच्या आजच्या जीवनात त्यांच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासाची प्रासांगिकता अभ्यासाअंती काही निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगता येतील.

1. स्वामी विवेकानंदांच्या विचारात देशहिताबरोबरच मानवहिताला प्राधान्य असल्याचे दिसून येते.
2. स्वामी विवेकानंद हे जातीभेद, उच्चनिच्चता यांच्या विरोधी असल्याचे दिसून येते.
3. समाजात क्रांती घडवून आणावयाची असेल तर समाजातील खालच्या वर्गांना शिक्षण देऊन सज्ञान करण्याची आवश्यकता त्यांनी सांगितली.
4. विवेकानंदांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यतत्वज्ञानाचा हेतू पिळवणूक रहित एकसंघ भारतीय समाज निर्मितीचा होता.
5. स्वामी विवेकानंदांचे विचार मानवतावादावर आधारलेले होते.
6. विवेकानंदांनी स्त्री—पुरुषांना समान स्थान देण्यात आले असून, स्त्री शक्ति हे राष्ट्रशक्ति आहे असे म्हटले.

ग्रंथसूची:—

1. स्वामी विवेकानंद, भारतीय व्याख्याने, मद्रास येथील व्हीकटोरिया हॉलमध्ये दिलेले व्याख्यान, रामकृष्ण मठ, नागपूर. पृ.क्र. 125
2. अभयंकर श.व., युगाचार्य स्वामी विवेकानंद, आदित्य प्रतिष्ठाण, पुणे. (जाने2003) पृ.क्र.60—61
3. दाभोळकर दत्तप्रसाद, शोध स्वामी विवेकानंदांचा, मनोविकास प्रकाशन, ,पुणे. (2008) पृ.क्र.164.
4. स्वामी विवेकानंद, धर्माची विज्ञान आणि तत्वज्ञानः पृ.क्र. 108.
5. दाभोळकर दत्तप्रसाद, शोध स्वामी विवेकानंदांचा, मनोविकास प्रकाशन,पुणे. 2008) पृ.क्र. 160—62
6. स्वामी विवेकानंद, भारताचे आध्यात्मिक विचारधारा, रामकृष्ण मठ, नागपूर. (2006) पृ.क्र.7.
7. स्वामी विवेकानंद, धर्माची विज्ञान आणि तत्वज्ञान. पृ.क्र. 106.
8. स्वामी विवेकानंद, ग्रंथावली, रामकृष्ण मठ, नागपूर 2007) पृ.क्र. 58—56
9. स्वामी विवेकानंद, हमारी शिक्षा, रामकृष्ण मठ, नागपूर. पृ.क्र. 220—21
10. स्वामी विवेकानंद, भारतीय नारी, रामकृष्ण मठ, नागपूर (1667) पृ.क्र. 40.
11. स्वामी विवेकानंद, ग्रंथावली, रामकृष्ण मठ, नागपूर . पृ.क्र. 40.